mail

## प्रेसनोट

दिनांक - २५/१०/२०२१

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील एकुण २० पोलीस शिपाई चालक व २१ पोलीस शिपाई रिक्त पदांसाठी पोलीस भरती करीता सन २०१९ मध्ये जाहीरात देण्यात आलेली होती. चालक पोलीस शिपाई पदाकरिता उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक १३/१०/२०२१ रोजी व पोलीस शिपाई पदासाठी लेखी परीक्षा दिनांक १८/१०/२०२१ रोजी घेण्यात आलेली आहे.

पोलीस शिपाई चालक लेखी परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे भरतीच्या पुढील प्रक्रियेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांची १:१० प्रमाणे प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादी प्रसिध्द करुन त्यांना दिनांक २८/१०/२०२१ रोजी सकाळी ७.३० वाजता पोलीस कवायत मैदान, पोलीस मुख्यालय सिंधुदुर्ग येथे कागदपत्र पडताळणी व उंची छाती मोजमाप या प्रक्रियेकरीता बोलविणेत आलेले आहे.

पोलीस शिपाई लेखी परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे भरतीच्या पुढील प्रक्रियेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांची १:१० प्रमाणे प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादी प्रसिध्द करुन त्यांना दिनांक २९/१०/२०२१ रोजी सकाळी ०५.०० वाजता पोलीस कवायत मैदान, पोलीस मुख्यालय सिंधुदुर्ग येथे कागदपत्र पडताळणी व उंची- छाती मोजमाप व मैदानी चाचणी या प्रक्रियेकरीता बोलविणेत आलेले आहे.

उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीसाठी हजर राहताना उमेदवार यांनी खालील नमुद मूळ **कागदपत्रे** व सदर कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचे स्वत: साक्षांकित केलेले **दोन संच** सोबत घेऊन येणे आहे.

१. दहावी/बारावी उत्तीर्ण गुण प्रमाणपत्र व बोर्ड सर्टिफिकेट
२. पदवी/पदविकाधारक/पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र (असल्यास)
३. जन्म दाखला
४. अधिवास दाखला
५. जातीचे प्रमाणपत्र
६. जात वैधता प्रमाणपत्र
७. महिला उमेदवारांकरीता नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र
८. भ.ज.-क, भ.ज.-ड, इमाव, इडब्ल्यूएस जात प्रवर्गाचा दावा करणाऱ्या पुरुष/महिला उमेदवारांना संबंधीत प्रवर्गाचे विधीग्राह्य जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात (नॉन क्रिमिलेअर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
९. समांतर आरक्षण (महिलांसाठी ३० टक्के आरक्षण/माजी सैनिक) याबाबतची विधी ग्राह्य प्रमाणपत्र.
१०. हलके वाहन (LMV/LMV-TR) चालविण्याचा वैध परवाना
११. ओळखपत्र (आधार कार्ड / मतदान कार्ड / वाहन परवाना / पॅन कार्ड इ.)
१२. ऑनलाईन आवेदन अर्ज
१३. पासपोर्ट साईज १० रंगीत फोटो

चालक पोलीस शिपाई पदासाठी वयोमर्यादा दिनांक ३१/१२/२०१९ अशी निश्चित करण्यात आलेली आहे तीच कागदपत्र पडताळणीबाबतची तारीख अंतिम असेल तथापि फक्त चालक पोलीस शिपाई पदासाठी LMV किंवा LMV-TR परवाना उपलब्धेसाठी दिनांक ८/१/२०२० अशी निश्चित करण्यात आलेली आहे. पोलीस शिपाई या पदासाठी वयोमर्यादा ही दिनांक ३०/९/२०१९ अशी निश्चित करण्यात आलेली आहे, तीच कागदपत्र पडताळणीबाबतची तारीख अंतिम असेल. तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळून उर्वरित

विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी १ मार्च २०१८ ते ३१.३.२०१९ या वर्षातील उत्पन्नाच्या आधारावर २०१९-२०२० या वित्तीय वर्षासाठी ग्राह्य असलेले अर्ज दाखल करण्याच्या अंतीम दिनांकापर्यंतचे नॉन क्रिमिलेअर सर्टीफिकेट विचारात घेण्यात येणार आहे व शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक ६/७/२०२१ नुसार सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातील उमेदवारांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आरक्षण अथवा अराखीव विकल्पाबाबतच्या ईडब्ल्युएस प्रमाण व नॉनक्रिमिलेअरचे मार्च २०२० चे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

उमेदवारांना काही अडचण असल्यास त्यांनी खालील नमुद दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**सिंधुदुर्ग पोलीस भरती मदत केंद्र कक्ष - ०२३६२-२२८००८**
**सिंधुदुर्ग पोलीस नियंत्रण कक्ष - ०२३६२२२८६१४**

( एस बी गावडे )
पोलीस उप अधीक्षक (मुख्या)
पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग करितां.

SUPERINTENDENT OF POLICE SINDHUDURG